दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १६० • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.१२ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# आ.रवींद्र वायकर शिंदे गटात दाखल:उद्धव ठाकरेंना मोठा धक्का

## योग्य वेळी धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतात-आ.रवींद्र वायकर

**मुंबई (वृत्तसंस्था)**–ठाकरे गटाचे आमदार रवींद्र वायकर यांनी शिवसेना शिंदे गटात रविवारी रात्री जाहीर प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा बंगल्यावर हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी खासदार गजानन कीर्तिकर यांची उपस्थिती होती. ऐन लोकसभा निवडणूक तोंडावर असतानाच उद्धव ठाकरे यांना पुन्हा धक्का मानला जात आहे.

माझा मतदारसंघातील कामे मार्गी लागली पाहिजे, या दृष्टीने मी प्रामुख्याने शिंदे साहेबांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केला. ते म्हणाले की, आरे बाबतीत लोक रडताहेत. रॉयल पंप एरियात पाण्याचे पंप, धोरणात्मक निर्णय बदलण्याची गरज होती म्हणून लोकांचे काम करणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे न्याय देतील म्हणून श्विसेनेत दाखल झालो, असे रवींद्र वायकर माध्यमांशी बोलताना म्हणाले.एकनाथ शिंदे म्हणाले की, बाळासाहेबांच्या विचारांच्या खऱ्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यांचे स्वागत आहे. गेली ४० ते ५० वर्षे ते बाळासाहेबांसोबत वायकर करत आले आहेत. मी काय किंवा गजानन कीर्तिकर काय आम्ही बाळासाहेबांचे विचार पुढे घेऊन काम करत आलो आहे. त्यांच्या मतदारसंघातील कामे मार्गी लावण्यासाठी त्यांनी जो निर्णय घेतला त्याचे मी स्वागत करतो. राज्यातील महायुतीच्या माध्यमातून काम करत आहे. म्हणून त्यांनी घेतलेला सकारात्मक निर्णयाचे स्वागत करतो. विश्वास ठेवत आमच्या मतदारांना व सर्वसाधारण मुंबईकरांचे काम करण्यासाठी मी स्वागत करतो. माझे आणि त्यांचे गैरसमज निर्माण होत असे पण आमच्यातील संभ्रम आता दूर होत गेला आहे. जिल्हा जिल्हातून तालुक्यातून लोक शिवसेनेत येत आहेत. मी दिलेला शब्द कधीही फिरवत नाही.बाळासाहेबांच्या विचारांचे सरकार स्थापन करून राज्याच्या विकासाचे कामे सुरू झाले आहेत. सर्वसमावेशक सर्व घटकांचा निर्णय घेतले आहेत. या सरकारने निर्णयावर धडाका लावला आहे. आपले सरकार अशी भावना लोकांच्या मनात निर्माण झाले.अडीच वर्षे जे नेगिटिव्ही होती ती बाजूला केली. चांगले दिवस संधी घेऊन आम्ही येत असतो असा विचार प्रत्येकाने करावा, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.रवींद्र वायकर यांच्यावर जोगेश्वरीतील कथित घोटाळ्याचे आरोप आहेत. त्यांची ईडीची चौकशीही सुरू आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतयांनी काही दिवसांपूर्वी ट्वीट करुन, रवींद्र वायकरांना ईडी



धमकावत असल्याचं म्हटलं होतं. तसेच, रवींद्र वायकरांना शिंदे गटात प्रवेश करण्यासाठी दबाव असल्याचंही संजय राऊतांनी म्हटलं होतं. दरम्यान, आतापर्यंत ठाकरेंच्या पाठीशी ठामपणे उभे असणारे वायकर एकाएकी शिवसेनेत प्रवेश करणार असल्यामुळे चर्चांना उधाण आलं आहे. तसेच, रवींद्र वायकरांच्या रुपात उद्धव ठाकरेंना आतापर्यंतचा सर्वा मोठा धक्का बसला आहे.जोगेश्वरी भूखंड घोटाळाप्रकरणी ईडीच्या रडारवर असलेले ठाकरे गटाचे आमदार आणि उद्धव ठाकरे यांचे विश्वासू सहकारी रवींद्र वायकर हे लवकरच शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून ठाकरे गटातील आणखी एक आमदार शिंदेंच्या गळाला लागल्याची चर्चा होती. या आमदाराने एकनाथ शिंदे यांची गुप्तपणे भेट घेतल्याचीही चर्चा होती. मात्र, हा आमदार नेमका कोण, हे समजू शकले नव्हते. मात्र, आता आमदार रवींद्र वायकर असल्याची माहिती समोर येत आहे.यापूर्वी ईडीने आर्थिक गैरव्यवहारप्रकरणात रवींद्र वायकर यांची चौकशी केली होती. गेल्या महिन्यात रवींद्र वायकर यांच्या घरावर ईडीने धाडही टाकली होती. त्यानंतर आता रवींद्र वायकर आता शिंदे गटात प्रवेश करतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. रवींद्र वायकर यांच्यासोबत स्थानिक शिवसैनिकही शिंदे गटात जाण्याची शक्यता आहे. वायकर यांनी सर्व नगरसेवक, शाखा प्रमुख, विभाग प्रमुखांना तयारीत राहण्याचे आदेश दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.जोगेश्वरीतून १९९२ मध्ये रवींद्र वायकर पहिल्यांदा मुंबई महानगरपालिकेवर निवडून गेले. २००६-२०१० या काळात वायकर मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष होते. त्यानंतर २००९, २०१४ आणि २०१९ मध्ये सलग तीनवेळा जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघातून वायकर आमदार म्हणून निवडून आले.

महाविकास आघाडी सरकारमध्ये रवींद्र वायकर यांच्याकडे गृहनिर्माण आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या राज्यमंत्रीपदाची धुरा होती. त्यानंतर २०१९ च्या महाविकास आघाडी सरकारमध्ये वायकर गृहनिर्माण विभागाचे राज्यमंत्री होते.

# जिल्हापरिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी संजय दैने यांची गडचिरोलीत जिल्हाधिकारी पदी वर्णी

## हिंगोलीत २ वर्षांत केली मोठी विकास कामे

**गडचिरोली | डॉ.विष्णू वैरागडे**

हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी संजय दैने यांची गडचिरोलीत जिल्हाधिकारी पदी बदली करण्यात आली आहे. सोमवारी त्यांच्या बदलीचे आदेश काढण्यात आले आहेत.



हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये दोन वर्षापुर्वी रूजू झालेल्या दैने यांनी जिल्हयात मोठी कामे केली आहेत. आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी त्यांनी प्रयत्न केले. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये ईसीजी मशीन व इतर अत्याधुनिक यंत्र उपलब्ध करून दिली आहेत. या शिवाय अंगणवाड्यांमधून आहार शिजविण्यासाठी होणारी इंधनाची अडचण लक्षात घेऊन या अंगणवाड्या धुरमुक्त करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यानुसार ९०० पेक्षा अधिक अंगणवाड्यांमधून १५ व्या वित्त आयोगातून गॅस सिलेंडर देऊन या अंगणवाड्या धुरमुक्त केल्या आहेत.या शिवाय वृक्षलागवड योजनेमध्ये त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम झाले आहे. ग्रामपंचायत, शाळा, पंचायत समिती, अंगणवाडीच्या परिसरात वृक्षलागवडीला प्रोत्साहन दिले. कळमनुरी पंचायत समिती इमारतीचे कामही त्यांच्याच काळात पूर्ण झाले आहे. तर हिंगोली पंचायत समितीची जागेची अडचण लक्षात घेऊन नवीन इमारतीचा प्रस्ताव शासनस्तरावरून मंजूर करून घेतला आहे. त्यामुळे लवकरच हिंगोली पंचायत समितीची इमारत उभी राहणार आहे. या सोबतच स्वच्छ भारत मिशनमध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीमधून सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छतागृहाच्या बांधकामासाठी गावपातळीवर भेटी दिल्या आहेत. तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी जल जिवन मिशन अंतर्गत मंजूर झालेल्या नळ पाणी पुरवठा योजनेची कामे गुणवत्तापूर्ण होण्यासाठी त्यांनी वेळोवेळी भेट देऊन पाहणी केली. घरकुल योजनेची कामे गतीमान करून लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ मिळवून दिला आहे. त्यांची आता गडचिरोलीचे जिल्हाधिकारी म्हणून बदली झाली आहे.

# राहुल गांधींच्या भारत जोडो न्याय यात्रेचा उद्या नंदूरबारमधून महाराष्ट्रात प्रवेश

## १७ तारखेला शिवाजी पार्कवर लोकसभा प्रचाराचा नारळ फोडणार

**मुंबई**–काँग्रेसचे नेते खासदार राहुलजी गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा उद्या दि. १२ मार्च रोजी दुपारी २ वाजता नंदूरबार जिल्ह्यातून महाराष्ट्रात प्रवेश करत आहे. त्यानंतर १३ मार्चला धुळे, मालेगाव, १४ मार्चला नाशिक, १५ मार्च रोजी पालघर, ठाणे असा प्रवास करत ही यात्रा १६ मार्च रोजी मुंबईत दाखल होणार आहे. १७ मार्चला भारत जोडो न्याय यात्रेचा समारोप शिवाजी पार्कवर होत असून याचवेळी इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकले जाणार आहे.



भारत जोडो न्याय यात्रेची सुरुवात १५ जानेवारीला मणिपूरमधून करण्यात आली असून यात्रेची सांगता मुंबईत होत आहे. ही यात्रा १५ राज्ये, १०० जिल्हे, ११० लोकसभा मतदारसंघातून ६७ दिवसांत ६७०० किमीचा प्रवास करत आहे. 'भारत जोडो न्याय यात्रा, न्याय का हक मिलने तक' या घोषवाक्यासह ही यात्रा मार्गक्रमण करत आहे. मागील वर्षी राहुलजी गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर ४००० किमी ची पदयात्रा काढली होती. या यात्रेला जनतेचे प्रचंड समर्थन लाभले होते तसाच भारत जोडो न्याय यात्रेलाही जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. भारतीय जनता पक्षाकडून भारत जोडो न्याय यात्रेत अडथळे आणण्याचा जाणीवपूर्क प्रयत्न केला पण यात्रा न डगमगता सुरुच राहिली. भारत जोडो न्याय यात्रेसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने जय्यत तयारी केली असून मुंबईत खासदार राहुल गांधी व न्याय यात्रेचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. यात्रेला व शिवाजी पार्क वरील जाहीर सभेला मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रदेश काँग्रेसकडून करण्यात येत आहे.

## सावंगीमध्ये अवैद्यरित्या डंम्पींग केलेली रेती केली जप्त

# अवैध गौण खनिज उत्खनन शोध पथकाची कारवाई,रेती तस्करांचे नावे गुलदस्त्यातच

**देसाईगंज | प्रतिनिधी**

देसाईगंज तालुक्यातील सावंगी येथे अवैद्यरित्या रेती डंम्पींग केली असल्याची माहिती मिळताच अवैध गौण खनिज उत्खनन शोध पथकाच्या नेतृत्वात तीन ते चार ठिकाणी धाड टाकुन जप्त केले आहे. सदर अवैद्य रेती चा साठा कुणी केले याबाबत अद्यापही माहिती न मिळाल्याने दंडात्मक कारवाई केली नसल्याचे सांगीतले जात आहे.




देसाईगंज तालुक्यात विर्शि,कुरुड,कोंढाळा,सावंगी, जुनी वडसा, आमगांव ही वैनगंगा नदिवरील रेती घाट आहेत. तर शंकरपुर,किन्हाळा,उसेगाव, बोडधा,अरततोंडी, कोकडी, विसोरा ही गाढवी नदिवरील रेती घाट आहेत. या रेती घाटाच्या लिलावातुन शासनाला दरवर्षी कोट्यावधी रूपयांचा महसूल मिळत असतो. रेती लिलाव प्रकरण थंडबस्त्यात असल्याने याचा गैरफायदा मात्र रेती तस्करांनी चांगलाच घेतला असुन वैनगंगा नदिवरील व गाढवी नदिवरील पात्रातील रेतीचा बेकायदेशिर उपसा करुन घाटातून रेतीची तस्करी केली जात असुन प्रती ट्रक्टर पाच ते सात हजार रुपये तर सतरा ते विस हजार रुपये प्रती टिप्पर ट्रक विकल्या जात आहे.

मात्र, देसाईगंज येथील रेती तस्करांनी एकत्र येत उपरोक्त रेतीघाटातून रात्रीच्या सुमारास ते पहाटेच्या सुमारास खुलेआम रेतीची तस्करी केली जात आहे.महसुल विभागाचे बरेच अधिकारी व कर्मचारी मुख्यालयीच रहात नसल्याने याचा गैरफायदा सुटीच्या दिवशी व शनिवार,रविवार ला रेती तस्करांचे चांगलेच फावते. एवढ्या मोठ्या प्रमाणात रेती तस्करी होत आहे, याबाबतची माहिती महसूल विभागातील अधिकाऱ्यांना असतांना मात्र याकडे महसूल विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत. रेती तस्करांनी नदी पात्रात मोठमोठे खड्डे तयार केले आहेत.रेती ची चोरी होत आहे ही बाब महसुल अधिकारी खाजगीत मान्य करतात.मात्र कारवाई का करित नाही हे न उलगडणारे कोडेच आहे. दरम्यान, काल रात्री सावंगी येथील ५० ते ६० च्या संख्येने असलेल्या जागृत नागरिकांनी महसूल विभागाला फोन करून सांगितले.शासकीय जागेमध्ये अवैद्यरित्या डंम्पींग केलेली रेती जवळ पास पाच ते सहा ठिकाणी अवैद्य रेती चा साठा करुन ठेवले असुन जप्त करण्यात आले आहे. अवैद्य रेती करणारा तस्कर व अवैद्य रेती चा साठा करणाय्राचे नाव अद्यापही कळले नसल्याने दंडात्मक कारवाई केली नसल्याचे सांगीतले जात आहे. सदर कारवाई अवैध गौण खनिज उत्खनन शोध पथकाचे मंडळ अधिकारी के पी ठाकरे, तलाठी सावंगी यू एल वनकर, तलाठी आमगाव बीरमल लोखंडे, जुनी वडसा तलाठी विनोद चट्टे व कोतवाल कमलेश मेश्राम यांनी पार पाडली..

# महायुतीच्या जागा वाटपाचे घोडे पुन्हा अडले दिल्लीत भाजप नेत्यांसोबतची बैठक लांबणीवर

## एकनाथ शिंदे, अजित पवारांचा दिल्ली दौरा रद्द

**मुंबई**–आगामी काळात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी बरोबरच महायुतीमध्ये देखील जागा वाटपावरून चांगलीच रस्सीखेच रंगली आहे. हायुतीतील जागा वाटपावर चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे आज दिल्लीला रवाना होणार होते. दिल्लीमध्ये होणाऱ्या बैठकीत जागा वाटपाबाबत अंतिम निर्णय होणार असल्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, काही कारणास्तव भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडून ही बैठक रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे आज महाराष्ट्रातील नेते दिल्लीला जाणार नसल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. मात्र, ही बैठक अचानक रद्द झाल्यामुळे नेमके शिजतेय काय? असा प्रश्न उपस्थित केला जातोय.





महायुतीमध्ये ८० टक्के जागा वाटपाचा निर्णय झाला असून केवळ २० टक्के जागांवर चर्चा करून येत्या दोन-तीन दिवसात निर्णय येईल असे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांना सांगितले होते. त्या संदर्भातच आज दिल्ली येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, ही बैठक अचानक रद्द करण्यात आली आहे. आमचे जागावाटप जवळपास निश्चित झाले असून काही मोजक्या जागांवर चर्चा बाकी असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे. आमच्यात फार ताणतणाव नाही, विरोधी पक्ष त्यांचे राजकारण कन्फ्युजनच्या आधारावर करत असल्याची टीका देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली होती.महायुतीमध्ये जागा वाटपावरून नाराजी नाट्य सुरू असल्याचे दिसून येत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीमध्ये मुंबई येथे झालेल्या बैठकीत जागा वाटपाबाबत चर्चा झाली. मात्र, अंतिम निर्णय होऊ शकला नाही. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी दिल्ली दौरा केला. दिल्ली येथे देखील या नेत्यांमध्ये बैठक झाली. मात्र, त्यावेळीही महायुतीमध्ये जागा वाटपाचा निर्णय झाला नाही. त्यामुळे आता पुन्हा दिल्ली दौरा महायुतीतील नेते करणार असल्याचे ठरले होते. महायुतीचे जागा वाटप नेमके कुठे अडले हे मात्र अद्याप समोर आलेला नाही.महायुतीच्या जागा वाटपामध्ये जास्तीत जास्त जागा या भारतीय जनता पक्ष लढवणार असल्याचे जवळपास स्पष्ट झाले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना तसेच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दहा पैक्षा कमी जागा देण्याचे आधीच ठरवले आहे. त्यामुळे शिवसेना आणि अजित पवार यांच्या गटांमध्ये नाराजी दिसून येत आहे. ज्या मतदारसंघांमध्ये आम्ही मागील निवडणुकीत विजय झालो होतो, ते मतदारसंघ आम्हाला देण्यात यावे, अशी मागणी एकनाथ शिंदे यांची शिवसेना तसेच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केली आहे. मात्र, तेवढ्या जागा देण्यास भाजप तयार नसल्याचे विश्वासनीय सुत्रांनी सांगितला आहे.भाजपच्या लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारीवरुन दिल्लीत दोन बैठकांचे आयोजन आज करण्यात आले आहे. या बैठकांमुळेच राज्यातील महायुतीचे नेते आज दिल्लीला रवाना झाले नाहीत. मात्र, भाजपच्या कोअर कमिटीचे सदस्य असलेले देवेंद्र फडणवीस आणि चंद्रकांत पाटील हे दोघेही दिल्लीला रवाना झाले आहेत. ते भाजपच्या बैठकीत सहभाग घेतील. अशी माहितीही सुत्रांनी दिली आहे.

# राज्यात अनेक नव्या उपक्रमांना चालनादाते!

**कार्यक्षम मंत्री, यशस्वी संसदपटू आणि जनसामान्यात ज्याची मुळे रुजली आहेत, असा उदारमतवादी नेता असे यशवंतरावांचे थोडक्यात वर्णन करता येईल. चाळीस वर्षांपेक्षा अधिक काळ ते राजकारणात होते आणि पंचवीसपेक्षा अधिक काळ अधिकार पदावर त्यांनी काढला. ते उत्तम वक्ते आणि लेखक होते. त्यांची विचारप्रवर्तक भाषणे सह्याद्रीचे वारे व युगांतर या ग्रंथांतून संगृहीत केलेली आहेत. अशा महाराष्ट्र राज्याच्या शिल्पकाराविषयी श्री कृ. गो. निकोडे– केजीएन यांनी दिलेली ही रोचक माहिती... संपादक.**

सन १९४६ साली तेव्हाच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळाची निवडणूक होऊन यशवंतराव चव्हाण हे दक्षिण सातारा मतदार संघातून निवडले गेले आणि संसदीय चिटणीस झाले. सन १९४८ साली त्यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या चिटणीस पदावर नियुक्ती झाली व १९५२च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य व पुरवठा खात्याचे मंत्री झाले. द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी दि.१ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्रे हाती घेतली. सन १९६० साली महाराष्ट्र राज्य स्थापन झाले व त्यांत ते पहिले मुख्यमंत्री निवडले गेले. पुढे १९६२–६६ या काळात ते भारताचे संरक्षणमंत्री, १९६६–७० या कालावधित गृहमंत्री, १९७०–७४ पर्यंत अर्थमंत्री आणि १९७४पासून परराष्ट्रमंत्री बनले होते.

यशवंतराव बळवंतराव चव्हाण हे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री आणि एक राष्ट्रीय नेते होते. देवराष्ट्रे– सातारा जिल्ह्यातील कराड येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबात दि.१२ मार्च १९१३ रोजी त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण कराड येथे घेऊन उच्च शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे घेतले. ते बीए नंतर एलएलबी झाले. इ.स.१९३० साली महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंग चळवळीत त्यांनी भाग घेतल्याने त्यांना पहिला तुरुंगवास घडला. या कारावासात मार्क्सवाद व मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांशी त्यांचा परिचय झाला. त्यामुळे काँग्रेसमधील रॉयपंथीय गटाशी त्यांचे संबंध वाढले. दुसरे महायुद्ध सुरू होण्याच्या वेळी यशवंतरावांना रॉय यांनी घेतलेली युद्धविषयक भूमिका अमान्य झाली. ते काँग्रेसमध्येच राहून १९४२च्या छोडो भारत आंदोलनात सामील झाले. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. यातून पुढे प्रतिसरकार स्थापन झाले, परंतु त्यावेळी ते तुरुंगात होते. त्यामुळे प्रतिसरकारशी त्यांचा तसा फारसा संबंध राहिला नव्हता. यशवंतराव हे मानवेंद्रनाथ रॉय यांची विचारसरणी व महात्मा गांधींची आंदोलने यांकडे आकर्षित झाले, तरी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या आचारविचारांचा त्यांच्यावर खोल ठसा उमटला होता. नेहरूंप्रमाणे डावीकडे झुकलेला मध्यममार्गी नेता, असे त्यांचे वर्णन करता येईल. त्यांच्या शासकीय तसेच प्रशासकीय कौशल्याचा व लोकनेतृत्वाचा प्रत्यय आला, जेव्हा द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्रिपद त्यांच्याकडे आले. त्यांनी अल्पसंख्य बिगरमराठी समाजाचा आणि काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांचा विश्वास आपल्या कर्तबगारीने तथा कार्यक्षम कारभाराने



संपादन केला. मुंबई राज्याचे विभाजन होऊन महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्याने काहीही उलथापालथ होणार नाही, याची खात्री त्यांनी वरिष्ठ नेत्यांना पटवून दिली.

यशवंतरावांनी चिनी आक्रमणानंतर संरक्षण खात्यात चैतन्य आणण्याची जबाबदारी पार पाडली. सन १९६७च्या निवडणुकीनंतर काँग्रेसचा अनेक राज्यांत पराभव झाला. त्यामुळे देशात जी अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती, त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते खंबीरपणे पण कौशल्याने सांभाळले. अर्थखाते त्यांच्याकडे आले, तेही बांगला देशाचे युद्ध, दुष्काळ वगैरेंमुळे खालावलेल्या आर्थिक परिस्थितीत. माजी संस्थानिकांचे तनखे रद्द करणे आदी उपाययोजना त्यांच्या कारकीर्दीत झाल्या. चलनवाढीला आळा घालण्याचे कडक उपाय योजण्याच्या धोरणाचा प्रारंभही यशवंतरावांच्या कारकीर्दीतच झाला. कार्यक्षम मंत्री, यशस्वी संसदपटू आणि जनसामान्यात ज्याची मुळे रुजली आहेत, असा उदारमतवादी नेता असे यशवंतरावांचे थोडक्यात वर्णन करता येईल. चाळीस वर्षांपेक्षा अधिक काळ ते राजकारणात होते आणि पंचवीसपेक्षा अधिक काळ अधिकार पदावर त्यांनी काढला. ते उत्तम वक्ते आणि लेखक होते. त्यांची विचारप्रवर्तक भाषणे सह्याद्रीचे वारे व युगांतर या ग्रंथांतून संगृहीत केलेली आहेत. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर त्यांनी निरनिराळ्या क्षेत्रांत अनेक नव्या उपक्रमांना चालना दिली. हे उपक्रम जसे सहकारी साखर कारखानदारीचे आहेत तसेच जिल्हा परिषदा, भाषा संचालनालय, साहित्य संस्कृती मंडळ आदी प्रकारचेही आहेत. त्यांच्याबद्दल परप्रांतीयांना आशा वाटत होती, तर महाराष्ट्रीयांना ते एक विश्वासाचे ठिकाण होते.

सन १९६९ साली काँग्रेसमध्ये फूट पडली असता ती सावरण्याच्या कामी यशवंतरावांनी आटोकाट प्रयत्न केले. देशात यादवीचे वातावरण न ठेवता समन्वयाचे असावे; कारण भारतासारख्या प्रचंड, भिन्न भिन्न जातिधर्मांच्या देशात त्याखेरीज आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगती होणार नाही, अशी त्यांची धारणा होती. पुरोगामी विचारांचा ते पाठपुरावा करत असर, ते पोथीनिष्ठ कधीच नव्हते. नीतिमूल्यांचा पुरस्कार व्यवहारात व्हावा, अशी त्यांची इच्छा व प्रयत्नही असत. झगमगाटापेक्षा संथपणा व सातत्य हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य होते आणि तेच त्यांचे शक्तिस्थानही! लोकप्रिय नेते यशवंतराव चव्हाण यांनी दि.२५ नोव्हेंबर १९८४ रोजी जगाचा निरोप घेतला.

!! जयंती दिनी त्यांच्या अनेक प्रेरक आठवणींना व कार्यकुशलतेला विनम्र अभिवादन !!


**केजीएन– श्री कृ. गो. निकोडे,**
**(से.नि.अध्यापक).**
**मु. पिसेवडधा, पो. देलनवाडी.**
**ता. आरमोरी, जि. गडचिरोली.**
**फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३.**

# सुसंस्कृत राजकारणी


# मा.यशवंतराव चव्हाण

**सांगली जिल्ह्यात कृष्णाकाठी सह्याद्रीच्या कुशीत कऱ्हाड तालुक्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावात एका गरीब कुटुंबात विठाबाई आणि बळवंतराव यांच्या उदरी १२ मार्च,१९१३ मध्ये यशवंतराव चव्हाण यांचा जन्म झाला. त्यांनी शालेय जीवनातच स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला, विद्यार्थिदशेत वयाच्या १७ व्या वर्षी तिरंगा फडकवल्याबद्दल १८ महिने तुरुंगवास भोगला, कष्टातून शिक्षण घेतले, पुढे देश स्वतंत्र झाल्यानंतर तेव्हाच्या मुंबई प्रांतिक मंत्रिमंडळात संसदीय सचिव, नंतर द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान, विरोधी पक्षनेते तसेच केंद्रीय वित्त आयोगाचे अध्यक्ष अशा अनेक महत्त्वाच्या पदांवर साहेबांनी काम केले. महाराष्ट्राचा थोर वैचारिक वारसा यशवंतरावांनी गतिमान केला. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील या महापुरुषांच्या विचारांचे ते प्रवक्ते होते. या विचारांचा वारसा जपत, विविध क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्य व कर्तुत्वाचा ठसा उमटवला.**

सहकार जाळे, लोकशाहीचे विकेंद्रीकरण, कृषी–औद्योगिक समाज व्यवस्थेची उभारणी या त्रिसूत्रीवर साहेबांनी भावी महाराष्ट्राच्या विकासाची वाटचाल निश्चित केली. त्यांच्या ४० वर्षांच्या कारकिर्दीतील प्रत्येक निर्णय राज्याच्या प्रगतीला गती आणि सर्वसामान्य माणसाला बळ देणारा होता. राज्यातील जनतेचं कल्याण हेच त्यांचे एकमेव ध्येय होते. साहेबाच्या व्यक्तिमत्वाचे खास पैलू म्हणजे, ते साहित्यिक, मित्र, सामान्य माणूस आणि शालेय विद्यार्थी यांनी पाठवलेल्या पत्रांना आवर्जून उत्तर देत, प्रेरणा व आशीर्वाद देत. मार्गदर्शन करत, लायक कार्यकर्त्यांना संधी देत, विरोधकाच्या मताचा आदर करत, आपल्या सहकाऱ्यांच्या कामात हस्तक्षेप करत नसत, त्यांना आपले विचार निर्भयपणे मांडण्याची मुभा देत, संघर्षापेक्षा सामंजस्याकडे त्यांचा अधिक कल होता. कमीत कमी राजकारण व अधिकाधिक समाजकारण–अर्थकारण या मूल्यावर आधारित वाटचाल त्यांना अभिप्रेत होती. सर्वांना बरोबर घेऊन बेरजेचे राजकारण करण्याची त्यांची हतोटी होती. महाराष्ट्रातील राजकीय पक्षांमध्ये आणि नेत्यांमध्ये वैचारिक मतभिन्नता असली तरी वैयक्तिक कटुता किंवा वैर कधीच येऊ दिले नाही, विरोधी पक्षातील नेत्यांशी वैयक्तिक मैत्री असणं आणि राज्याच्या विकासासाठी या सर्वांनी एकत्र येणं, असं सकारात्मक वातावरण केवळ महाराष्ट्रातच दिसू शकतं. ही सर्व साहेबांच्या संस्कारांची आणि विचारांची देणगी आहे.१९५७ मध्ये मुख्यमंत्र्यांच्या निवडणुकीत भाऊसाहेब हिरे विरुद्ध यशवंतराव चव्हाण अशी लढत झाली, यामध्ये साहेब विजयी झाले. याच काळातच भाऊसाहेब हिरे यांच्या कन्येचा विवाहसमारंभ मालेगावात होता. या समारंभाचे आग्रहाचे आमंत्रण हिरे यांनी दिले, या समारंभास साहेब येणार नाहीत अशी जोरात चर्चा होती, कारण भाऊसाहेब विरोधात उभे होते, परंतू मा. वि. वा. नेने आपल्या 'मी पाहिलेले यशवंतराव' पुस्तकात आठवणीत सांगतात, तुम्ही आलात म्हणायचे समारंभाला यशवंतराव म्हणाले, का ? असे का म्हणतोस ? मी म्हटले, तुम्ही या समारंभास येणार नाही असा जोरात प्रचार या बाजूस चालला होता म्हणून म्हटले. यशवंतराव त्यावर म्हणाले, हे बघ बापू, माझे व भाऊसाहेबांचे मतभेद आहेत हे खरे. पण ते राजकीय पातळीवर आहेत. वैयक्तिक त्यांचे व माझे भांडण थोडेच आहे ? विवाहसमारंभ हा खासगी समारंभ आहे. त्याला हजर राहण्याआड मी राजकीय मतभेद का आणू ? ही माझी नीती नाही. वागण्याची पद्धत नाही. राजकीय मतभेद वैयक्तिक संबंधाआड येऊ देऊ नयेत, हा पायंडा सर्वांनीच पाळला तर किती चांगले होईल. आजच्या सर्व राजकारण्यांनी साहेबांच्या या कृतीतून बोध घेण्यासारखे आहे. विशेषत: गावपातळीवरील नेते आणि कार्यकर्ते यांनी आपसात राजकारणापायी वैर बाळगणे किती गैर आहे, हे या उदाहरणावरून लक्षात घ्यावे.यशवंतराव चव्हाण साहेबांचे राजकारण, त्यांचे भाषण,लेखन, वर्तन हे नितीमान राजकारणाचा एक आदर्श वस्तुपाठ होते. महाबळेश्वर येथील काँग्रेस पक्षाच्या शिबिरात त्यांनी नेत्यांना व कार्यकर्त्यांना एक मोलाचा सल्ला दिला होता. निवडणूक असो व नसो आपल्या पक्षाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी जाहीर सभा कार्यक्रमांमध्ये काय बोलावे याचा तर अभ्यास करावाच पण काय बोलू नये याचे पथ्यही पाळले पाहिजे ते कधीही व्यक्तिगत आयुष्यात व सार्वजनिक व्यासपीठावर संसदीय मर्यादा व नीतिमत्ता सोडून बोलले नाहीत. किंवा विरोधकांवर असंसदीय भाषेत, खालच्या पातळीवर जाऊन टीका केली नाही.संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या समितीच्या नेत्याकडून टिका होत असे.



डॉ.प्रकाश खेत्री,
छ.संभाजीनगर,
७८४३०९२२४४



या टिकेमध्ये प्रख्यात साहित्यिक, दै. मराठाचे संपादक प्र. के. अत्रे हे आघाडीवर होते. एकदा एका पत्रकाराने मराठा वृत्तपत्रातील टिकेसंदर्भात यशवंतरावांना प्रश्न विचारला तेव्हा साहेबांनी अत्यंत नम्रपणे उत्तर दिले की, अत्रेंची दर्जेदार साहित्यिक म्हणून माझ्या मनात असलेली प्रतिमा मलिन होऊ नये म्हणून मी मराठा वृत्तपत्र वाचतच नाही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर प्र. के. अत्रे यांनी 'निपुत्रिक यशवंतरावांच्या हाती महाराष्ट्राची धुरा' अशा मथळ्याचा यशवंतरावांवर टिका करणारा एक लेख लिहिला. या लेखाबद्दल ऐकल्यानंतर दुसऱ्या दिवशी यशवंतराव चव्हाण यांनी अत्रेंना फोन केला. यशवंतराव म्हणाले, अत्रे साहेब, तुम्ही मला निपुत्रिक म्हणता पण अहो मी निपुत्रिक नाही चले जाव चळवळीवेळी मला अटक करण्यासाठी पोलिसांनी माझ्या घरावर धाड टाकली होती. त्यावेळी माझी पत्नी वेणू गरोदर होती. इंग्रजांच्या हाताला मी लागलो नाही. त्याचा राग त्यांनी माझ्या पत्नीवर म्हणजेच वेणूवर काढला. त्यांनी वेणूच्या पोटावर काठीने मारलं. या सगळ्यात तिच्या पोटात असलेला गर्भ पडला. तसंच गर्भशयाला देखील दुखापत झाली आणि त्याचमुळे पुन्हा मला मुल होण्यात अडचण आली. यशवंतराव चव्हाण यांचं फोनवरील बोलणं ऐकून आचार्य अत्रे यांना आपली चूक लक्षात आली. त्यानंतर क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी यशवंतराव चव्हाणांची माफी मागितली. आणि यशवंतरावांच्या घरी जाऊन वेणूताईसमोर अत्रेंनी पश्चातापही व्यक्त केला. पुढे जाहीरसभेतही त्यांनी यशवंतरावांची माफी मागितली. अशी वैयक्तिक टीका करूनही साहेबांनी आचार्य अत्र्यांच्या लिखाण आणि विचार स्वातंत्र्यावर बंधने लादली नाहीत की त्यांच्या वृत्तपत्राला कोणत्याही अडचणी निर्माण केल्या नाहीत, संपादक व लेखकाना वैचारिक आणि लेखन स्वातंत्र्य असेल तरच ते मुक्तपणे लिहू शकतील, तेव्हाच लोकशाही प्रगल्भ होईल, असे ते मानत. यावरून साहेबांची वैचारिक प्रगल्भता, उदारता आणि सुसंस्कृतपणा लक्षात येतो. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर 'हे राज्य मराठी माणसांचे असेल की मराठा माणसांचे ?' असा परखड सवाल ग.त्र्यं. माडखोलकरांनी यशवंतराव चव्हाणांना विचारला होता. यशवंतरावांनी देखील तेवढ्याच आत्मविश्वासाने आणि वैचारिक प्रग्लभतेतून 'हे राज्य मराठी माणसांचे होईल' असे उत्तर दिले होते. या वैचारिक बैठकीला अनुसरून त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या विकासाची स्वप्ने उराशी बाळगली व प्रत्येक्षात आणली. महाराष्ट्रात आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांबद्दल ज्यांचं उत्पन्न ९०० रू. च्या आत आहे, त्यांच्या मुलांना विद्यापीठीय शिक्षण मोफत केलं जावं असा निर्णय घेतला. तेव्हा पुण्याला एका शिक्षणतज्ज्ञांनी प्रश्न विचारला. हे शिक्षण मोफत केले तर संकट निर्माण होईल याची जाणीव आहे का ? तेव्हा शिक्षणतज्ज्ञ म्हणाले, शिक्षित आणि प्रशिक्षित लोकांचं सैन्य निर्माण होईल आणि ते उद्या बंड करून उठतील ..! तेव्हा साहेबांनी उत्तर देतांना त्यांना सांगितलं की, मी जरूर याचा विचार केलाय. माझं असं मत आहे की, ही अशिक्षित सेना राहण्यापेक्षा शिक्षित सेना जर झाली आणि स्वतःचे आणि देशाचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी बंड केलं तर माझ्या निर्णय व कामाचा हेतू सफल झाला असं मी मानेन. हा निर्णय लागू झाला, या सवलतीला इ.बी.सी. सवलत म्हणतात. ज्ञानाची लोकशाही निर्माण करण्याचे काम या एका निर्णयामुळे महाराष्ट्रात झाले. बंदुकीतून झालेल्या क्रांती पेक्षा शिक्षणातून झालेली क्रांती अधिक परिणामकारक व शाश्वत असते. या निर्णयामुळे सामान्य शेतकऱ्याचा मुलगा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आला. याबरोबरच साहेबांनी शिक्षण, सहकारी आणि सेवाभावी आदी संस्था उभारण्यातही सिंहाचा वाटा आणि मोठे पाठबळ दिले. संस्था कोणत्या एका व्यक्ती वा पक्षाच्या नसतात, संस्थाप्रमुख हे केवळ विश्वस्थ असतात, त्यांनी स्वत:ला मालक समजू नये, संस्था या समाज आणि जनतेच्या असतात, हे मानत यशवंतरावांनी महाराष्ट्रभर विविध संस्थाना मदत केली, सर्व संस्थाना आपल्या घरच्या बागेतील रोपां व झाडाप्रमाणे सांभाळले, जोपासले. तसेच त्यांची अंत:करणापासून पाठराखण केली. महाराष्ट्रातील आजच्या राजकारणी नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी यशवंतरावजींकडून एवढी बाब जर शिकली वा आत्मसात केली तर महाराष्ट्राचे लोकजीवन समृध्द होत ते फुलायला वेळ लागणार नाही.आज मात्र यशवंतराव चव्हाण यांच्या मूल्याधिष्ठित, सुसंस्कृत व गुणसंपन्न राजकारणाची प्रचंड उपेक्षा होत आहे. आजचे काही राजकारणी एकमेकांच्या नावाने रोजच शिमगा करत आहेत. दिवसेंदिवस महाराष्ट्राच्या राजकारणातील भाषेचा स्तर खालावतांना दिसतो आहे. विचारांच्या ऐवजी विखार, विरोधाच्या ऐवजी विद्वेष, मतभेदाच्या ऐवजी मनभेद, स्पर्धेच्या ऐवजी शत्रुत्व, सहकाराच्या ऐवजी 'स्व'हकार, विश्वासाच्या ऐवजी विश्वासघात आणि काही चालक मालक बनत आहेत. या सर्व बाबी आता महाराष्ट्राच्या राजकारणात पहावयास मिळत आहेत, रुजू लागल्या आहेत. प्रगत, पुरोगामी आणि सुसंकृत महाराष्ट्रासाठी हे सर्व चिंताजनक आहे, या परिस्थितीवर अगदी सोप्या भाषेत भाष्य करताना मा. मधुकर भावे आपल्या 'यशवंतराव ते विलासराव' या पुस्तकात लिहितात, ''यशवंतराव पाच वर्षांचे असताना पंढरपूरला गेले होते. त्यांच्या आईने यशवंतरावांच्या मामाला सांगितले होते की, यशवंताचे बोट घट्ट पकड, नसता तो गर्दीत भरकटेल. हणुमंत मामाने पाच वर्षांच्या यशवंतरावांचे बोट अगदी घट्ट पकडून ठेवले. त्यामुळे यशवंतराव गर्दीत भरकटले नाहीत. महाराष्ट्राने मात्र यशवंतरावांचे पकडलेले बोट सोडले, म्हणून महाराष्ट्र आज काहीसा भरकटलेला दिसतो.'' तेव्हा यशवंतराव चव्हाण साहेबांचे वैचारिक बोट आपल्या हातून सुटनार नाही... ! याची काळजी आणि विचार साहेबांच्या जयंती दिवशी आज महाराष्ट्रातील नेते, कार्यकर्ते आणि सामान्य जनता यांनी करायला हवा...! हेच मा. यशवंतराव चव्हाण साहेबांना खरे अभिवादन ठरेल...!

# भारतीय साहित्यविषयक विविध उपक्रम!

साहित्य अकादमी ही एक भारतीय भाषांचे संवर्धन करणारी भारतीय संस्था आहे. या संस्थेची स्थापना दि.१२ मार्च १९५४ रोजी झाली. या संस्थेला सरकारी अनुदान असले तरी स्वरूप स्वायत्त आहे. साहित्य अकादमी ही साहित्याच्या क्षेत्रात वेगवेगळे उपक्रम राबवत असते. या अंतर्गत संशोधन, तसेच लेखकांसाठी प्रवास अशा उपक्रमांसाठी अर्थपुरवठा करते. तसेच साहित्य अकादमी पुस्तके व समकालीन भारतीय साहित्य हे हिंदी भाषा भाषेतील नियतकालिक ही प्रकाशित करते. भारतीय साहित्याचा विश्वकोशही साहित्य अकादमी ने प्रकाशित केला आहे. साहित्य अकदामीचे बहुभाषिक व अतिशय समृद्ध असे भारतातील एक प्रमुख ग्रंथालय आहे. भारतीय भाषा साहित्य अकॅडमीने २४ भाषांना मान्यता दिली आहे.

ही भारतीय साहित्यविषयक विविध उपक्रम व कार्ये अमलात आणणारी, भारतातील राष्ट्रीय पातळीवरची प्रमुख साहित्यसंस्था आहे. दि.१२ मार्च १९५४ रोजी नवी दिल्ली येथे ही साहित्यसंस्था स्थापन झाली. ही केंद्र शासनाच्या अखत्यारीखालील स्वायत्त स्वरूपाची संस्था असून तिला भारत सरकारच्या सांस्कृतिक खात्यातर्फे पूर्णतः आर्थिक अनुदान दिले जाते. १९५६ मध्ये साहित्यसंस्था म्हणून तिची अधिकृत नोंदणी झाली. भूतपूर्व पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु हे या संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. या अकादेमीचे प्रमुख कार्य भारतातील साहित्यविषयक पूर्वसंचिताचे जतन करून, नवीन स्वतंत्र तसेच अनुवादित वाङ्मयाच्या निर्मितीला प्रोत्साहन देणे, हे आहे. अकादेमी विविध प्रादेशिक भाषांतील लेखकांना उत्तेजनार्थ पारितोषिके व मानचिन्हे देऊन गौरवीत असते. प्रकाशने, अनुवाद, परिसंवाद, कार्यशाळा, देशाच्या विविध भागांत साहित्यमेळाव्यांचे आयोजन, लेखकांच्या वाचकांशी भेटी घडवून आणणे, असे नानाविध प्रकारचे उपक्रम राबवून त्यांद्वारे भारतीय साहित्याच्या अभिवृद्धीस व विकासास चालना देणे, हे या संस्थेचे उद्दिष्टानुसारी प्रमुख कार्यक्षेत्र आहे. अकादेमीच्या वतीने प्रकाशनांचा विस्तृत व विविधस्वरूपी कार्यक्रम राबविला जातो. भारतीय भाषांतील समकालीन वाङ्मयाची सूची तयार करणे, समकालीन लेखकांच्या उत्कृष्ट व निवडक साहित्यकृतींचे संग्रह प्रकाशित करणे, आधुनिक भारतीय भाषांतील वाङ्मयाचा इतिहास व विकास यांचा विस्तृत आढावा घेणारे प्रमाणभूत ग्रंथ इंग्रजी व हिंदी भाषांत तयार करून घेऊन ते प्रकाशित करणे, प्राचीन संस्कृत महाकाव्ये व पुराणे यांच्या सटीप आवृत्त्या प्रसिद्ध करणे इ.अनेक योजना व उपक्रम अकादेमीने आजपावेतो राबविले आहेत. भारतीय भाषांचे इतिहास प्रकाशित करून भारतातील प्रमुख भाषांच्या विकासाला उत्तेजन देणे व त्यांना जास्तीत जास्त परस्परांच्या सान्निध्यात आणणे, हे उद्दिष्ट अकादेमीने साध्य केले आहे. आपल्या देशातील विविध भाषांचा परिचय सर्वांना असणे शक्य नाही; परंतु भारतातील प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीने आपल्या भाषेतील ज्ञानाबरोबरच इतर भाषांतील साहित्याची माहिती करून घेण्याची इच्छा ठेवली पाहिजे. इतर भाषांत लिहिलेल्या ग्रंथांचा, तसेच प्रसिद्ध पुस्तकांचा परिचय करून घेतला पाहिजे व या प्रकारे आपल्या व्यक्तिमत्त्वात भारतीय संस्कृतीचा विशाल व उदार दृष्टिकोण आणि बहुभाषिक प्रेरणा वृद्धिंगत केली पाहिजे, पं.नेहरुंच्या या उद्गारांमध्ये साहित्य अकादेमीच्या कार्याची उद्दिष्टे नेमकेपणाने प्रतिबिंबित झाली आहेत. या प्रक्रियेला मदत म्हणून साहित्य अकादेमीने भारतातील प्रादेशिक भाषांमधील प्रसिद्ध पुस्तकांचे इतर प्रादेशिक भाषांमध्ये अनुवाद करण्याची व विविध भारतीय भाषांचे इतिहास प्रसिद्ध करण्याची योजना कार्यान्वित केली आहे. अकादेमीच्या या प्रयत्नांमुळे आपल्या मातृभाषेतून अन्य विविध भारतीय भाषांतील साहित्याचा आस्वाद घेणाऱ्या वाचकांच्या साहित्यिक– सांस्कृतिक ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याचे, त्या अधिक सखोल करण्याचे आणि भारतीय विचार व साहित्य यांच्यामागील एकात्म पार्श्वभूमीचे त्यांचे भान जागृत करण्याचे अकादेमीचे उद्दिष्ट बव्हंशी साध्य झाले आहे.आपल्या विविधस्वरूपी उपक्रमांची कार्यप्रणाली व पद्धती निश्चित करण्यासाठी अकादेमीने लिखित संविधान तयार केले असून त्यातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार अकादेमीचे कार्य चालते. अकादेमीने एकूण चोवीस प्रादेशिक भारतीय भाषांना अधिकृत मान्यता दिलेली आहे. त्या प्रत्येक प्रादेशिक भाषेतील एकूण दहा सदस्यांचे सल्लागार मंडळ अकादेमीमार्फत स्थापले जाते व त्या त्या प्रादेशिक भाषेतील अकादेमीकृत कार्याचे आयोजन व सुसूत्रीकरण या सल्लागार मंडळामार्फत केले जाते. संबंधित भाषेतील वेगवेगळे उपक्रम, पुरस्कार, अनुवादयोजना राबविण्यासाठी ग्रंथनिवड इ.अनेक बाबतींत हे सल्लागार मंडळ अकादेमीला सल्ला देत असते व त्यानुसार अकादेमी कार्यवाही करते. पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण या चार प्रादेशिक विभागांसाठी वेगवेगळी चार प्रादेशिक विभागीय कार्यालये अकादेमीने स्थापन केली आहेत व त्या त्या प्रादेशिक विभागांतील भाषांमध्ये परस्पर आदान–प्रदान घडवून आणणे, हे या विभागीय कार्यालयांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. नवी दिल्ली येथे अकादेमीचे मुख्य मध्यवर्ती कार्यालय असून कोलकाता, मुंबई, बंगलोर व चेन्नई येथे प्रादेशिक विभागीय कार्यालये आहेत. अकादेमीचे चार भाषांतर–विभाग असून ते बंगलोर, दिल्ली, अहमदाबाद व कोलकाता येथे आहेत. बडोदे येथे अकादेमीचे प्रकल्प कार्यालय असून तेथे मौखिक तसेच आदिवासी साहित्याचे जतन व विकासाचे कार्य चालते. भारतीय भाषांतील साहित्याचे अभिलेखागारही तेथे आहे. नवी दिल्ली येथील मुख्य कार्यालयात तसेच बंगलोर व कोलकाता येथील विभागीय कार्यालयांत बहुभाषिक ग्रंथांचा विपुल, प्रचंड व मौलिक साठा असलेली वैशिष्ट्यपूर्ण व समृद्ध ग्रंथालये आहेत. चोवीस प्रादेशिक भाषांतील सुमारे दीड लाख ग्रंथ हे या संग्रहालयाचे लक्षणीय वैशिष्ट्य होय.

साहित्य अकादेमी प्रतिवर्षी मान्यताप्राप्त चोवीस प्रादेशिक भाषांतील सर्वोत्कृष्ट सर्जनशील साहित्यकृतींसाठी चोवीस पुरस्कार व अनुवादित ग्रंथांसाठी चोवीस पुरस्कार देत असते. इंग्रजी भाषिक ग्रंथांसाठीही पुरस्कार ठेवले आहेत. स्वतंत्र साहित्यकृतीसाठी रु.एक लाख आणि मानचिन्ह व अनुवादित कृतीसाठी रु.पंचवीस हजार आणि मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. शिवाय साहित्यातील मौलिक योगदानाबद्दल साहित्यिकांना विशेष गौरववृत्ती दिली जाते. या संदर्भात मराठी साहित्यातील विशेष उल्लेखनीय दोन घटना म्हणजे, साहित्य अकादेमीने सर्वोत्कृष्ट भारतीय ग्रंथांना पुरस्कार देण्याची योजना १९५५पासून सुरू केली. त्या योजनेतील पहिला मराठी पुरस्कार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वैदिक संस्कृतीचा विकास या ग्रंथाला लाभला, तसेच साहित्य अकादेमीने २००४मधील सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त जाहीर केलेल्या पहिल्या विशेष जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी श्रेष्ठ दलित कवी नामदेव ढसाळ हे ठरले. साहित्य अकादेमीमार्फत भाषा सम्मान हा पुरस्कार प्रादेशिक भाषांच्या विकासकार्यार्थ दिला जातो. दक्षिण आशियाई भाषांतील विद्वानांना आनंद कुमारस्वामी पुरस्कार देण्यात येतो. भारतीय साहित्याच्या संदर्भात विशेष मौलिक कार्य करणाऱ्या परकीय विद्वानांना सन्मान्य गौरववृत्ती दिली जाते. साहित्य अकादेमी एकूण चोवीस प्रादेशिक भाषांत व इंग्रजी भाषेतही पुस्तके प्रकाशित करते. या योजनेंतर्गत भारतीय भाषांतील पारितोषिकप्राप्त पुस्तकांचे अनुवाद, भारतीय साहित्यातील सर्व प्रादेशिक भाषांतील श्रेष्ठ आणि युगप्रवर्तक साहित्यिकांवर, त्यांचे जीवन व वाङ्मयीन कार्यांचा परिचय करून देणाऱ्या व्याप्तिलेखवजा प्रबंधिका, भारतीय प्रादेशिक भाषांचे वाङ्मयेतिहास, भारतीय तसेच विश्वसाहित्यातील श्रेष्ठ, अभिजात साहित्यकृतींची प्रादेशिक भाषांत भाषांतरे, निवडक ललित साहित्यकृतींची उदा. कथा, कविता, निबंध इ. संकलने, चरित्रे, भारतीय साहित्यिकांचे अल्पपरिचयात्मक कोश, अनुवाद–सूची, भारतीय साहित्यकोश इ.विविध प्रकारची पुस्तके अकादेमीने प्रकाशित केली आहेत. या वेगवेगळ्या प्रकारांत अकादेमीने सुमारे ४ हजार पुस्तके प्रकाशित केली आहेत. विशेष संदर्भमूल्य असलेल्या, अकादेमीमार्फत प्रकाशित काही महत्त्वाच्या ग्रंथांचा उदाहरणादाखल निर्देश करता येईल– एन्सायक्लोपीडिया ऑफ इंडियन लिटरेचर पाच खंड– १९८७–९२ हा भारतीय साहित्यकोश; नॅशनल बिब्लिऑग्रफी ऑफ इंडियन लिटरेचर– चार खंड: १९०१–५३ ही राष्ट्रीय ग्रंथसूची; निरनिराळ्या प्रादेशिक भाषांतील विद्यमान लेखकांचा अल्पपरिचय करून देणारा हूज हू ऑफ इंडियन रायटर्स– दोन खंड: १९९९; डॉ.सुकुमार सेनकृत हिस्टरी ऑफ बेंगॉली लिटरेचर– १९६० यांसारखे भारतातील प्रादेशिक भाषांतील साहित्याचे इंग्रजी, हिंदी भाषांतील इतिहास; मेन ऑफ लेटर्स तसेच मेकर्स ऑफ इंडियन लिटरेचर अशा ग्रंथमालांतर्गत भारतीय साहित्याच्या इतिहासातील महत्त्वाच्या टप्प्यांवरील युगप्रवर्तक अशा प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन साहित्यिकांचे जीवन व वाङ्मय यांचा परिचय करून देणारी इंग्रजी पुस्तकांची मालिका, याशिवाय साहित्य अकादेमीतर्फे इंडियन लिटरेचर– इंग्रजी भाषेतील द्वैमासिक, समकालीन भारतीय साहित्य– हिंदी भाषेतील द्वैमासिक व संस्कृत प्रतिभा– संस्कृत भाषेतील अर्धवार्षिक ही तीन नियतकालिके प्रकाशित केली जातात. वाङ्मयेतिहास, सौंदर्यशास्त्र तसेच विविध वाङ्मयीन विषयांवर अकादेमीमार्फत प्रतिवर्षी सुमारे तीस चर्चासत्रे प्रादेशिक, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरांवरही आयोजित केली जातात. त्याचप्रमाणे अनेक प्रकारच्या कार्यक्रम मालिकाही योजिल्या जातात. उदा.मीट द ऑथर, कविसंधी, कथासंधी, अस्मिता, मुलाकात, मेन अँड बुक्स, थ्रू माय विंडो, लोक, द मेनी व्हॉइसेस, आविष्कार, अंतराल, लिटररी फोरम अशा विविध वाङ्मयीन कार्यक्रमांचे हिंदी, इंग्रजी भाषांत आयोजन केले जाते. याशिवाय अकादेमी नियमितपणे अनुवाद–कार्यशाळाही भरवते.अकादेमी दर वर्षी साधारण फेब्रुवारी महिन्यात साहित्य–महोत्सव सप्ताह आयोजित करते. या आठवडाभरात काही विशिष्ट विषयांवर प्रकल्प योजिले जातात. उदा.प्राचीन भारतीय साहित्य, मध्ययुगीन भारतीय साहित्य, आधुनिक भारतीय साहित्य यांसारखे विषय या प्रकल्पांत चर्चिले जातात. याबरोबरच अकादेमीने गेल्या सुमारे पाच सहस्रकांच्या कालावधीतील उत्कृष्ट निवडक भारतीय साहित्यकृतींचे संकलन एकूण दहा खंडांत प्रकाशित केले आहे. भारताच्या वेगवेगळ्या भागांतील आदिवासींच्या साहित्याचे भाषांतर व प्रकाशन हा अकादेमीने हाती घेतलेला आणखी एक महत्त्वपूर्ण प्रकल्प होय. बडोदे येथील अकादेमीच्या कार्यालयात तो कार्यान्वित करण्यात आला आहे. ह्या प्रकल्पांतर्गत पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अकादेमीने नॅशनल बुक ट्रस्टच्या सहकार्याने एक संयुक्त प्रकल्प राबविला असून त्याअंतर्गत शंभर भारतीय अभिजात साहित्यकृतींच्या भाषांतराची महत्त्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली आहे. भारतीय साहित्याच्या अभिलेखागाराची योजना हा अकादेमीचा आणखी एक महत्त्वपूर्ण प्रकल्प होय. या प्रकल्पांतर्गत चित्रफिती, दृक्ध्वनिफिती, श्रवणफिती, सीडी आदी तांत्रिक साधनांद्वारे भारतातील दुर्मीळ व मौलिक साहित्यधनाचे जतन व दस्तऐवजीकरण तसेच श्रेष्ठ भारतीय साहित्यिकांची मूळ हस्तलिखिते, छायाचित्रे इ. सामग्री जतन करणे, अशा काही योजना राबविल्या जात आहेत. अकादेमीच्या वतीने निरनिराळ्या राज्यांतील गुणी, तरुण लेखकांना प्रवासशिष्यवृत्ती दिली जाते. त्यांनी भारतातील अन्य राज्यांमध्ये जाऊन तेथील लेखकांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधावा, तसेच तेथील प्रादेशिक साहित्य–संस्कृतीचा परिचय करून घ्यावा, या उद्देशाने अशा शिष्यवृत्त्या दिल्या जातात. अकादेमीच्या सांस्कृतिक देवाण–घेवाण योजनेच्या अंतर्गत भिन्न भिन्न प्रदेशांतील– भाषांतील लेखकांनी परस्परांचे साहित्य अनुवादित व प्रकाशित करणे, तसेच दोन भिन्न भाषिक राज्यांमध्ये लेखक–विद्वानांची परस्पर आवक–जावक असे अनेकविध उपक्रम राबविले जातात. भारतातील सर्व राज्यांमधील प्रादेशिक भाषांमध्ये परस्परजवळीक साधावी, वाङ्मयीन आदान–प्रदान व्हावे, त्यायोगे साहित्यिक– सांस्कृतिक एकात्मतेची जाण वृद्धिंगत व्हावी आणि देशाच्या सांस्कृतिक व भावनात्मक ऐक्यास हातभार लावावा, ही अकादेमीची भूमिका या सर्व प्रकल्प–उपक्रमांमागे कार्यरत आहे.

साहित्य अकादमी पुरस्कार हा साहित्य क्षेत्रातील एक सर्वोच्च सन्मान असून साहित्य अकादमी, नवी दिल्ली या संस्थेतर्फे दर वर्षी २४ भारतीय भाषांतील सर्वोत्तम साहित्यांसाठी दिला जातो. या पुरस्काराचे स्वरूप हे पुरस्काराचे मानचिन्ह, (जे स्वतः श्रेष्ठ दिग्दर्शक सत्यजित रे यांनी डिझाईन केले आहे.) आणि १ लाख रोख रक्कम असे आहे. साहित्य अकादमीची स्थापना ही १९५४ साली भारताच्या सांस्कृतिक खात्याने केली असून त्याचा उद्देश हा भारतात अभिजात साहित्याचा प्रचार करणे हा आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा साहित्य अकादमी पुरस्कार दरवर्षी दिला जातो. या पुरस्काराच्या नामांकनाची प्रक्रिया ही वर्षभर सुरू असते. यामध्ये सर्वात आधी प्रत्येक भाषेतील तज्ञ व्यक्तींची समिती नेमली जाते, ज्यातून त्या त्या भाषेतील ५ उत्कृष्ट पुस्तकांची निवड केली जाते. जी पुढे प्राथमिक समितीपुढे मांडली जाते. या समितीतून ज्या ज्या पुस्तकांच्या नावाची शिफारस होईल त्या पुस्तकांचा ३ पंचांकडून परत विचार केला जातो आणि शेवटचा निर्णय होऊन हा पुरस्कार जाहीर होतो. या पुरस्काराचे निकष म्हणजे साहित्य हे अभिजातच हवे, ज्यातून त्या भाषेचा आणि संस्कृतीचा प्रचार होईल. तसेच एकदा साहित्य अकादमी मिळालेल्या लेखकाचा परत विचार केला जात नाही. अपूर्ण साहित्य, संशोधनपर ग्रंथ, दुसर्या साहित्याचा आधार घेऊन लिहिलेली पुस्तके, अनुवादित पुस्तके, एकापेक्षा जास्त लेखकांनी लिहिलेली पुस्तके, तसेच साहित्य अकादमी मंडळात काम करणार्या लेखकांची पुस्तके अशा साहित्यांना या पुरस्कारात स्थान नसते. तसेच लेखक किंवा प्रकाशक स्वतः स्वतःच्या पुस्तकाची शिफारस करू शकत नाही. तसेच एखाद्या मृत्यू पावलेल्या लेखकाच्या मृत्यूच्या पाच वर्षांपर्यंतच त्याच्या साहित्याची शिफारस करता येते. या सर्व निकषांवरच ही पुस्तके निवडली जातात. सन १९५५पासून हा पुरस्कार देण्यात येत आहे.

!! राष्ट्रीय साहित्य अकादमी स्थापना दिनाच्या सप्ताहभर समस्त साहित्यिक बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**– संकलन व सुलेखन –**
**श्री कृष्णकुमार आनंदी–**
**गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष– ७७७५०४१०८६.**

# केंद्रातील भाजपा सरकारने ओबीसींना न्याय दिला-संजय गाते

**वर्धा । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ओबीसींच्या कल्याणासाठी विविध योजना कार्यान्वित केल्या. ओबीसींना न्याय देणारे एकमेव सरकार भाजपा सरकार आहेत. विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून कारागीर ओबीसींना आत्मनिर्भर करण्याचे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. त्यामुळे ओबीसी मोर्चाच्या माध्यमातून संपूर्ण ओबीसी समाज मोदीजींच्या मागे उभा करून पुन्हा एकदा भाजपाच्या नेतृत्वाखाली केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी संपूर्ण शक्ती प्रणाला लावूया असे आवाहन भाजपा ओबीसी मोर्चा चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संजय गाते यांनी केले. वर्धा विधानसभा ओबीसी मोर्चाच्या संमेलनाचे प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

वर्धा विधानसभा ओबीसी मोर्चा मेळावा दि.११ मार्चला सकाळी शितल मंगल कार्यालय येथे आयोजीत करण्यात आला. या प्रसंगी प्रदेश अध्यक्ष ओबीसी मोर्चा संजय गाते, जिल्हा भाजपा अध्यक्ष सुनिल गफाट, माजी खासदार सुरेश वाघमारे यांनी मेळाव्याला संबोधित केले.माजी खासदार सुरेश वाघमारे व जिल्हा भाजपा अध्यक्ष सुनिल गफाट यांनी सर्वांनी येणाऱ्या निवडणुकीत मोदीजीनी प्रत्येक क्षेत्रात केलेले काम, राममंदिर, काश्मीर प्रश्न,३७० कलम, तीन तलाक, जवानाचे सक्षमीकरण , व शेतकरी, महीला, कामगार, विदयार्थी ला लागू करण्यात आलेल्या योजना समाजातल्या खालच्या पातळीवर केलेले काम, याची माहिती समाजात या योजनेची माहिती करुण देण्यासाठी सर्वांनी निवडणुकीत सक्रीय सहभागी राहून आपल्या भागात बुथ मजबुत करून त्या भागातील जास्तीत जास्त मतदान मिळवावे असे आवाहन केले.





प्रास्ताविक जिल्हा ओबीसी मोर्चाअध्यक्ष मंगेश झाडे, संचलन जिल्हा महामंत्री चन्द्रशेखर घाटे, आभार प्रदर्शन अरुण ठाकरे यांनी केले या प्रसंगी नगर भाजपा अध्यक्ष निलेश पोहेकर, विधानसभा निवडणुक प्रमूख प्रशांत बुरले भाजपा जिल्हा सरचिटणीस गुंडू कावळे गिरीश कांबळे,अविनाश ठाकरे, सचिन चन्ने, किशोर बोकडे, किशोर झाडे, प्रिती महल्ले, गायत्री झाडे, सुनंदा निशाणे, ओबीसी नेते नीलकंठ राव पिसे, उपासे , सौ रत्ना ठाकरे, ललिता काकडे सुधीर अखतकर व महिला भगिनी व पदाधिकारी, कार्यकर्ते या प्रसंगी भरपूर प्रमाणात उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात तीन खाजगी शाळा यशस्वी

**वरोरा । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात तालुक्यातील अनेक शाळांनी १ जानेवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत सहभाग घेतला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात आले . अभियानांतर्गत खाजगी शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले.यामध्ये विद्यार्थी,शिक्षक,पालक , माजी विद्यार्थी यांच्यात समन्वय ठेऊन यांच्यात शाळेविषयी उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी,विद्यार्थ्यांना शिकतांना प्रेरणादायी वातावरणाची निर्मिती व्हावी ,विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात शालेय उपक्रमाची माहिती व अभ्यास अवगत होऊन त्यांचा बुद्ध्यांक वाढावा यासाठी सदर अभियान राबविण्यात आले.

या अभियानात महाराष्ट्रातील अनेक शाळांनी सहभाग घेतला.वरोरा तालुक्यातील खाजगी व्यवस्थापनाच्या ४१ शाळांनी यामध्ये सहभाग घेतला होता.शाळांनी राबविलेल्या उपक्रमांची पाहणी करून गटशिक्षणाधिकारी ज्ञानेश्वर



चहारे,शिक्षण विस्तार अधिकारी नामदेव राऊत,सीमा राऊत, मुडपल्लीवार यांचा समावेश असणाऱ्या मूल्यांकन समितीने पारदर्शकता ठेऊन मूल्यांकन केले.मूल्यांकन मध्ये वरोरा येथील हिरालाल लोया विद्यालय (प्रथम), नूतन नेहरू विद्यालय नागरी (द्वितीय),आणि आनंद माध्यमिक विद्यालय,आनंदवन या शाळेने (तृतिय)क्रमांक प्राप्त केला.विविध निकषावर आधारित शाळांची निवड करण्यात आली.अभियानामध्ये हिरालाल लोया चे मुख्याध्यापक तथा प्राचार्य रविकांत जोशी,सर्व अध्यापक,अध्यापिका तथा कर्मचारी,विद्यार्थी यांचे कौतुक भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष निरजबाबू गोठी व सचिव कृष्णकांत लोया यांनी केले.तसेच नूतन नेहरू विद्यालय संस्थेचे अध्यक्ष दिलीप टिपले यांनी कौतुक केले.आणि आनंद माध्यमिक विद्यालय आनंदवन चे मुख्याध्यापिका सह सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम करून शाळेला नवीन दिशा देण्याचे कार्य केले.अभियानात यशस्वी होण्यासाठी महारोगी सेवा समिती चे सचिव तथा शाळा व्यवस्थापन कमिटी चे अध्यक्ष डॉ.विकास आमटे,कौस्तुभ आमटे,पल्लवी आमटे,विश्वस्त सुधाकर कडू,शाळा व्यवस्थापन कमिटी चे कोषाध्यक्ष सारिका सौसागडे आदिंचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.डॉ.विकास आमटे यांनी सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# यादवराव पोशट्टीवार महाविद्यालयात व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील तळोधी (बा.)येथील यादवराव पोशट्टीवार महाविद्यालयात सात दिवस चालणाऱ्या व्यक्तीमत्व विकास कार्यशाळेचे नुकतेच उदघाटन करण्यात आले.

या सात दिवसीय चालणाऱ्या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी. अरुणप्रकाश होते.तर कार्यशाळेचे उदघाटन गोंडवाना विद्यापीठ मानव विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.ए.चंद्रमौली यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच गोंडवाना विद्यापीठ इंग्रजी पदवुत्तर विभाग प्रमुख डॉ. विवेक जोशी,डॉ.गौरव देशमुख व विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रमुख प्रा.उपेंद्र चिटमलवार व आदी मान्यवर मंचावर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रजल्वन व मान्यवरांचे स्वागतगीत करून करण्यात आली. प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण विभाग प्रमुख प्रा.उपेंद्र चिटमलवार यांनी केले. प्रास्ताविकेतून त्यांनी सात दिवसांमध्ये होणाऱ्या विविध कार्यशाळेच्या विषयाचे व मार्गदर्शकांची ओळख



व माहिती करून दिली. याप्रसंगी प्रमुख वक्ते डॉ.ए.चंद्रमौली यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी अशा कार्यक्रमाचे आयोजन करणे हे अतिशय आवश्यक आहे. कारण आजचा विद्यार्थी हा मोबाईल संस्कृतीमुळे भरकटलेला आहे. अश्या कार्यक्रमाच्या माध्यमातूनच त्यांचा व्यक्तिमत्व विकास होईल व ते आपली प्रगती करू शकेल. असे सांगितले.तर डॉ.विवेक जोशी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकास साधने गरजेचा आहे आणि ही आजच्या काळाची गरज आहे. तसेच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये व्यक्तिमत्व विकासावर अधिक भर देण्यात आलेला आहे याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य पी . अरुणप्रकाश म्हणाले की विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय नेहमी तत्पर आहे.आणि याच दृष्टीने सात दिवशीय व्यक्तिमत्त्व विकासाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचा समग्र विकास हेच आमचे ध्येय असून या ध्येयाप्रती महाविद्यालयाची भूमिका नेहमी सकारात्मक राहिली आहे.असे मार्गदर्शन केले.उदघाटनानंतर पहिल्या सत्रात प्रा.श्वेता इंदुरकर, वनस्पतीविभाग यांनी 'पर्यावरण व मानव सहसबंध' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे संचालन प्रा. मेघा रतकंठीवार यांनी केले तर आभार प्रा. संजय चव्हाण यांनी मानले.या कार्यक्रमाला सर्व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



**नागभीड तालुक्यातील मिंडाळा– मिंथुर रस्त्यावर उंच झाडाच्या पूर्ण खोडाच्या सभोवताल खालपासून उंच मातीचे आवरण बनले. अन....मुंग्यानी बनवले चक्क झाडाच्या सभोवताल घर... छाया :प्रणय बांगरे.**

# चिमूर येथे महिलासम्मेलन जागर स्त्रीशक्तीचा कार्यक्रम संपन्न



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर येथे कुणबी समाज महिला संघटन तालुका चिमूर च्या वतीने महिलासंमेलन जागर स्त्रीशक्तीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया यांच्यासमवेत मेघा भांगडीया व अपर्णाताई भांगडीया यांची प्रमुख उपस्थिती होती.

दि. १० मार्च रोजी आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया यांच्यासमवेत मेघा मितेश भांगडीया व अपर्णा कीर्तिकुमार भांगडीया यांनी शहीद बालाजी रायपूरकर सभागृह, वडाळा (पैकू), चिमूर येथे कुणबी समाज महिला संघटन तालुका चिमूर च्या वतीने आयोजित महिलासम्मेलन जागर स्त्रीशक्तीचा या कार्यक्रमाला मोलाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी सर्वप्रथम जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज, हिंदवी स्वराज्याच्या जननी राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व सर्व थोर संत महात्म्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण तथा दीपप्रज्वलन करून विनम्र अभिवादन केले. तसेच, उपस्थित महिला-भगिनींशी विविध विषयांवर संवाद साधून शुभेच्छा दिल्या. दरम्यान, कुणबी समाज महिला संघटन तालुका चिमूर च्या वतीने आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया यांच्या समवेत मेघा मितेश भांगडीया व अपर्णा कीर्तिकुमार भांगडीया यांचे आगमनाप्रसंगी औक्षण करत स्वागत केले. आणि पुष्पगुच्छ व शाल-श्रीफळ भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा ज्योती ठाकरे, प्रमुख पाहुणे शुभांगी जाधव, ममता डुकरे, हर्षाताई वैद्य, धनश्री यावले, सविता वडस्कर, निता लांडगे व अन्य महिला भगिनी तसेच, सर्वश्री भाजपा तालुकाध्यक्ष राजू पाटील झाडे, भाजपा तालूका महामंत्री प्रशांत चिडे, भाजपा ज्येष्ठ नेते घनश्याम डुकरे, भाजपा नेते विलास कोराम आणि अन्य मान्यवर व कुणबी समाज संघटनेच्या महिला उपस्थित होत्या.

# १२ मार्च रोजी दुपारी २ ते रात्री ९ वाजेपर्यंत चंद्रपूर - बल्लारपूर रस्त्या वरील जड वाहतुकीस प्रतिबंध

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बल्लारपूर तालुक्यातील मौजा विसापूर येथे ११ मार्च २०२४ रोजी बॉटनिकल गार्डनचा उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला होता. मात्र प्रशासकीय कारणास्तव सदर कार्यक्रमात बदल होऊन आता १२ मार्च २०२४ रोजी विसापूर येथे बॉटनिकल गार्डनचे लोकार्पण व विविध कार्यक्रमांचे भूमिपूजन होणार आहे.

त्यामुळे या कार्यक्रमाकरीता मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहणार आहे. सोबतच या कार्यक्रमाकरीता राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व इतर मंत्री येण्याची शक्यता आहे. त्यामुळे चंद्रपूर ते बॉटनिकल गार्डन, विसापूर या मार्गावरून मंत्री महोदयांचे आगमन व निर्गमन होणार असल्याने त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये म्हणून सदर मार्गावरील अवजड वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी निर्गमित केले असून १२ मार्च २०२४ रोजी दुपारी २ वाजतापासून रात्री ९ वाजेपर्यंत बामणी फाटा, बल्लारपूर ते बंगाली कॅम्प, चंद्रपूर या मार्गावर अवजड वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत अवजड वाहतूकदारांनी खालीलप्रमाणे पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

१.वरोरा, भद्रावती व चंद्रपूरकडून राजुरा किंवा गडचांदूरकडे जाण्यासाठी पडोली - धानोरा फाटा भोयगाव रस्त्याचा वापर करावा.

२.गडचांदूर व राजुरा कडून वरोरा, भद्रावती, चंद्रपूरकडे येण्यासाठी भोयगाव - धानोरा फाटा - पडोली या मार्गाचा वापर करावा.

३. गोंडपिपरी व कोठारी कडून चंद्रपूर किंवा मूलकडे जाण्यासाठी येनबोडी - पोंभुर्णा तर चंद्रपूर व मूल कडून बल्लारशहा, गोंडपिपरी, राजुराकडे जाण्याकरीता पोंभुर्णा - येनबोडी या मार्गाचा वापर करावा.वरील आदेशाचे पालन करून जड वाहतुकदारांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

# येनोली माल येथे जागतिक महिला दिन साजरा

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील येनोली माल येथे मागील वर्षांपासून महिलांनी पुढाकार घेत महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा केला आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी सभापती पंचायत समिती प्रणयाताई गड्डमवार , उद्धाटक ठाणेदार अजितसिंग देवरे , प्रमुख पाहुणे सरपंच अमोल बावनकर, सरपंच शालू हांडेकर, वनरक्षक सिंग ,पत्रकार योगेश्वर शेंडे , नरेश शाळा व्य. समिती अध्यक्ष मडावी , तंटा मुक्ती अध्यक्ष अशोक कुर्वे , सामाजिक कार्यकर्ते जीवन झोडे , मारोती झोडे , डॉ. गुरनुले, डॉ.गिरडकर, सरपंच गणेश गड्डमवार मिंडाळा, प्रभा बावनकर, निळूबाई झोडे, भरती सोनवाणे आदी उपस्थित होते.अजितसिंग देवरे ठाणेदार यांनी महिलांवर होत असलेल्या अन्याया विरुद्ध लढण्याची शक्ती तसेच आजच्या काळात महिला मोबाईल चा वापर



करत असतांना मोबाईल ची सेंटिंग तसेच बाकी अप्लिकेशन चे सेंटिंग बंद ठेवून वापर करण्यास सांगितले अध्यक्ष प्राणया गड्डमवार यांनी महिलांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून समोर येऊन महिला सक्षम झाल्या पाहिजे यासाठी महिलांनी प्रयत्न करावे असे आपल्या भाषणातून सांगितले. उद्धघाटन नंतर लगेच महिलांनी सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात केली यामध्ये गावातील सर्व महिलांनी सहभाग घेत नृत्य सादर केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राखी स्वप्नील गिरडकर यांनी केले तर प्रस्तावित सरपंच अमोल बावनकर व आभारप्रदर्शन उषा पांडुरंग सोनवाणे यांनी केले.

# अल्पसंख्याक विभाग चंद्रपूर उपजिल्हा प्रमुख पदी अनवाज कुरेशी यांची नियुक्ती

**पोंभुर्णा । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा मुख्य नेते शिवसेना एकनाथ शिंदे यांचे आदेशाने व किरण पांडव पूर्व विदर्भ संपर्क प्रमुख यांचे सुचनेनुसार, चंद्रपूर जिल्हाप्रमुख नितीन मत्ते यांच्या मार्गदर्शनात,महाराष्ट्र शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष सईद खान यांनी चंद्रपूर शिवसेना अल्पसंख्याक विभाग उपजिल्हा प्रमुख पदी अनवाज कुरेशी यांची नियुक्ती केली.

ही नियुक्ती शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे चंद्रपूर जिल्ह्याचे जिल्हा प्रमुख जमील शेख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रमुख उपस्थित करण्यात आली.महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांचे जनसामान्य जनतेचे हिताचे निर्णय,कष्टकरी शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय,कामगारांना न्याय देण्याचे निर्णय,जनतेच्या हितासाठी



सरकारच्या माध्यमातुन विविध योजना राबवत आहे.यांना प्रेरित होऊन ही जिम्मेदारी स्वीकारून पक्षासाठी एक निष्ठेने काम करत राहणार असे अनवाज कुरेशी यांनी व्यक्त केले सांगण्यात आले.शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे चंद्रपूर उपजिल्हा प्रमुख पदी,अनवाज कुरेशी यांची नियुक्ती झाल्याची माहिती कळताच चंद्रपूर जिल्ह्यातील शिवसैनिकांकडून आणि पोंभुर्णा तालुक्यातील शिवसैनिकांकडून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# खेळाडूंनी खाशाबा जाधव यांचे स्वप्न पूर्ण करावे-ना.संजय बनसोडे

## उदगीर शहरात अद्यावत क्रीडा संकुल उभारणार

**उदगीर–**जागतिक ऑलम्पिक स्पर्धेत सुवर्णपदक मिळविण्याचे स्व. खाशाबा जाधव यांचे स्वप्न होते, ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्यातील खेळाडूंनी प्रयत्न करावेत असे आवाहन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी केले.उदगीर येथील तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर आयोजित स्व. खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे उदघाटन ना. बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी माजी आ.गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, बसवराज पाटील नागराळकर, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर - घुगे, पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, अर्जुन पुरस्कार विजेते काका पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, व्यंकटराव बेद्रे, रमेश अंबरखाने, मल्लिकार्जुन मानकरी, गुलाब पटवारी, तीन वेळा महाराष्ट्र केसरी किताब पटकावणारे उपविभागीय पोलीस विजय चौधरी, बापू लोखंडे, नामदेव कदम, प्रसिध्द मल्ल असलम काही, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, मुख्याधिकारी सुंदर बोंदर, बालाजी भोसले पाटील, वसंत पाटील, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे , संग्राम हासुळे पाटील, आदी





उपस्थित होते.

पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी गोवा येथे मागच्या काळात पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राला २२८ पदके मिळाली असल्याची माहिती देऊन राज्याचा क्रीडा मंत्री म्हणून ही पदके स्वीकारताना आपल्याला विशेष अभिमान असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले. कुस्ती हा खेळ मराठवाड्यात लोकप्रिय असून लातूर जिल्ह्याला देखील कुस्तीचा समृद्ध असा वारसा आहे. तो वारसा पुढे नेण्यासाठी जिल्ह्यातील कुस्तीपटूंना प्रेरणा म्हणून यासाठी उदगीर येथे राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले असल्याचेही यावेळी ना. बनसोडे यांनी सांगितले.उदगीरसह ग्रामीण भागातील खेळाडूंना खेळण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शहरातील तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर १४ कोटी रुपये खर्च करून भव्य दिव्य क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त तोंडार येथील कारखान्याजवळ गायरान जमिनीवर जवळपास ८२ कोटी रुपये खर्च करून भव्यदिव्य असे अद्ययावत क्रीडा संकुल उभारण्याचा माझा मानस आहे. या कामाचे लवकरच भूमिपूजन करण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा मंत्री ना. संजय बनसोडे यांनी दिली. अवघ्या चार दिवसात भव्य दिव्य अशा राज्यस्तरीय कुस्तीस्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल आयोजन समितीच्या पदाधिकारी यांचे ना. बनसोडे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्याचे क्रीडा उपसंचालक संजय सबनीस यांनी केले.यावेळी कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असलेल्या अभिनेत्री शेफाली जरीवाला यांनी काटा लगा, झिंगाट व अन्य गाण्यावर नृत्याविष्कार सादर केला.यावेळी लेझर शो च्या माध्यमातून कुस्तीचा इतिहास व खाशाबा जाधव यांच्या कार्याची माहीती दाखविण्यात आली. त्यानंतर व फायर शो करुन कार्यक्रमाची शोभा वाढवली.

### ईटोली येथे पाणपोईचे उद्घाटन

# अजिंक्य स्टोन क्रेशरचा आगळा-वेगळा उपक्रम

**जिंतूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील सर्वात मोठे असलेले गाव ईटोली या ठिकाणी कै.बाबाराव घुगे यांच्या स्मरणार्थ अजिंक्य स्टोन क्रेशर चा आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला असून अजिंक्य स्टोन क्रेशर ला आज रविवारी तीन वर्षे पूर्ण होत असल्यामुळे अजिंक्य स्टोन क्रेशर चे मालक बालाजी सांगळे यांनी गेल्या वर्षी जनावरांना पिण्याच्या पाण्याचे दोन हौदाची व्यवस्था केली होती परंतु नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून आज रविवारी ईटोली येथे बस स्थानक समोर कै बाबारावजी घुगे यांच्या स्मरणार्थ थंड पिण्याच्या पाण्याची पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले उदघाटन बालू आप्पा ईश्वर आप्पा तडकसे व ईटोली येथील माजी सरपंच श्रीकांत घुगे यांच्या हस्ते करण्यात आले तालुक्यात सर्वात मोठे आसलेले गाव ईटोली येथे ग्रामीण भागातील येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून अजिंक्य स्ट्रोशन



क्रेशर चे मालक बालाजी सांगळे यांनी कै बाबारावजी घुगे यांच्या स्मरणार्थ आज पाणी उद्घाटन करण्यात आले यामुळे या ठिकाणी साईबाबा विद्यालय भगवान बाबा विद्यालय मीनाताई ठाकरे विद्यालय या मोठमोठ्या तीन शाळा असल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने या शाळेत येतात त्यामुळे विद्यार्थ्यांची व नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून हा उपक्रम अजिंक्य स्टोन क्रेशर चे मालक बालाजी सांगळे यांनी केला आहे यामुळे ग्रामीण भागातील नागरिक व विद्यार्थी यांची गैरसोय लक्षात घेता त्यांनी या पाणपोईचे उद्घाटन केले आहे यावेळी गावातील नागरिक विश्वनाथ आप्पा तोडकर अश्रुबा समतकर गोविंदराव राऊत गंगा राऊत दत्ता खुणे संतोष आडे संतोष वाघ रंगनाथ घुगे विश्वनाथ राऊत शिवाजी आडे हरी सामतकर विजय आडे देवराव घुगे भुरा आडे प्रकाश घुगे संतोष घुगे संतोष खुणे इत्यादी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सेलू येथे रक्तदान शिबीर संपन्न

**सेलू । प्रतिनिधी**

धनलक्ष्मी महिला नागरी सहकारी पतसंस्था सेलू, डॉक्टर्स असोसिएशन सेलू आणि शांतिदूत परीवार पुणे,शाखा सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबीर येथील आदर्श नगरातील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात आज संपन्न झाले. शिबीराचे उद्घाटक म्हणून सुप्रसिध्द बांधकाम व्यावसायिक आर.बी.घोडके होते तर मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जि.प.चे माजी बांधकाम सभापती तथा बळीराजा संघर्ष समितीचे अध्यक्ष अशोक नाना काकडे हे होते.



जागतिक महिला दिन आणि थोर समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त जिल्हा सामान्य रुग्णालय परभणी आणि उपजिल्हा रुग्णालय सेलू यांच्या मार्गदर्शनाखाली या रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून शिबीराचे उद्घाटन करण्यात आले होते. यावेळी आजपर्यंत चौत्तीस वेळा रक्त दान केल्या बद्दल डॉ. प्रवीणजी जोग आणि पद्माकरराव कुलकर्णी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर नूतन महाविद्यालयातील प्रा.संजय पिंपळगावकर यांचा मुलगा डॉ. श्रीनिवास पिंपळगांवकर आणि त्याची वैद्यकीय महाविद्यालयाची टीम मागील आठवड्यात भारताच्या राष्ट्रपती महामहीम द्रौपदी मूर्मू यांची भेट घेऊन आल्या बद्दल प्रा.पिंपळगांवकर यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला जिल्हा उप रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.जनार्धन गोळेगांवर, इंजीनियर मा. बलदवा, डॉ.ऋतूराज साडेगांवकर , रघुनाथ बागल, उदय रोडगे, जनसेवा मदत केंद्राचे संचालक सचिन धापसे आदींची प्रमुख उपस्थिती होती.जिल्हा सामान्य रुग्णालय परभणी येथील रक्त पेढीचे डॉ.अमीत बोरगांवकर, आत्माराम जटाळे, विठ्ठल शिंदे, किशोर जाधव,राम ढेंगळे, मारोती सिरगजवार या टीमने रक्त संकलनाचे काम पाहिले. एकूण तीस रक्तदात्यांनी या शिबिरात रक्तदान केले. रक्तदान केल्यानंतर रक्तदात्यांचा गुलाब पुष्प आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक उफाडे यांनी केले, सुत्र संचालन राधाकिशन (महाराज)गोरे यांनी तर उपस्थितांचे आणि रक्तदात्यांचे आभार शांतीदूतच्या सेलू शाखेचे प्रतिनिधी डी.व्ही.मुळे यांनी व्यक्त केले.

# संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या सभेसाठी सारंगापूर येथील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने निधी सुपूर्द

**मानवत । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी विविध ठिकाणी संवाद दौरा व सभेच्या आयोजन केले आहे. मानवत शहरात मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या सभेचे आयोजन रविवारी केले असता या सभेसाठी मानवत तालुक्यातुन सकल मराठा समाजाचा वतीने निधी उपलब्ध करुन दिला याच बरोबर तालुक्यातील मौ. सारंगापूर येथील सकल मराठा समाज बांधवानी ही खारीचा वाटा म्हणून ३१ हजार रुपये निधी संकलन



करून सभेसाठी दिला यावेळी सभेचे संयोजक यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात आला. यावेळी सारंगापूर येथील सकल मराठा समाज बांधव यांची या वेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

# कौसडी येथे स्वस्त धान्य दुकानाच्या माध्यमातून साडी व थैल्यांचे वाटप

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथे स्वस्त धान्य दुकानाच्या माध्यमातून अंतोदय महिलांना साडी व थैलांचे वाटप करण्यात आले.मोदी सरकारची हमी सर्वांना धान्य पोषण युक्त समाजच्या योजनेअंतर्गत दिनांक १० मार्च रविवार रोजी वार्ड क्रमांक २ मधील स्वस्त धान्य दुकान क्रमांक २ च्या माध्यमातून अंतोदय लाभार्थ्यांना साड्या व थैल्यांचे वाटप करण्यात आले आहे. या योजनेचा सर्व लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आव्हान स्वस्त धान्य दुकानदार आयुब खान पठाण यांच्या वतीने करण्यात आले आहे. या योजनेच्या उदघाटन प्रसंगी सोसायटीचे चेअरमनगणपत बहिरट माजी उपसरपंच चंद्रकांत कुलकर्णी ग्रामपंचायत सदस्य अशोकराव कुलकर्णी ग्रामपंचायत सदस्य अन्वर पटेल ग्रामपंचायत सदस्य नाथा इखे ग्रामपंचायत सदस्य बालासाहेब बहिरट ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर बारवकर रवी कुलकर्णी अविनाश गोरे यांच्यासह नागरिक व लाभार्थी उपस्थित होते.




# ॲड.सोमनाथ काळे संपादीत आठवणीतील आबासाहेब पुस्तकाचे सोमवारी प्रकाशन

**सांगोला । प्रतिनिधी**

भाई जयंत पाटील याच्या हस्ते प्रकाशन तर रोहित पवार मा. प्रविणदादा गायकवाड, डॉ. बाबासाहेब देशमुख यांची प्रमुख उपस्थिती मातृभूमी सेवा प्रतिष्ठान, पुणे यांच्या वतीने पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांचा सन्मान आणि बक्षीस वितरण समारंभ तसेच या स्पर्धेतील निवडक निबंधाच्या संकलन करून ड. सोमनाथ काळे संपादीत केलेल्या 'आठवणीतले आबासाहेब' या पुस्तकाचे पुस्तक प्रकाशन सोमवारी दि. ११ मार्च २०२४ रोजी सांगोला मार्केट कमिटी येथे होत आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने सोमवारी भव्य शेतकरी मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्याला मा.भाई जयंत पाटील, मा.आ. रोहित पवार मा. प्रविणदादा गायकवाड, पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मा.डॉ. बाबासाहेब देशमुख




उपस्थित राहणार असून या मेळाव्यात व्यासपीठावर या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. या स्पर्धेतील विजेत्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे

विद्यार्थी गट

प्रथम क्रमांक - सुप्रिया भानुदास दिघे, द्वितीय क्रमांक - वैष्णवी सदानंद हालदांडे, तृतीय क्रमांक - स्वप्नील राजेंद्र शिंदे, उत्तेजनार्थ क्रमांक - दिशांत किशोर चीलवकर, लतिका राजेंद्र इंगोले

खुला गट

प्रथम क्रमांक - प्रा. डॉ. नागनाथ दत्तात्रय घोरपडे,द्वितीय क्रमांक - प्रा.विशाल भागवत सरतापे,तृतीय क्रमांक - जयश्री यशवंत पाटील,उत्तेजनार्थ क्रमांक - आबासाहेब तुकाराम हाके, प्रगती पंडित भोसले.

अधिक माहितीसाठी विजेत्यांनी खालील नंबरवर संपर्क साधावा.८५३०००१५५३ असे आवाहन आयोजकांनी केले आहे

# अक्कलकोट-जेऊरमार्गे बरूर रस्त्यासाठी २७० कोटी-सचिन कल्याणशेट्टी

**अक्कलकोट :** अक्कलकोट ते जेऊरमार्गे बरूर या अतिशय महत्त्वाच्या असलेल्या दोन राज्यांना जोडणाऱ्या ४५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी २७० कोटी रुपये मंजूर झाल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे.गेल्या ३० वर्षापासून तडवळ भागाच्यादृष्टीने आणि मराठवाड्यातील नांदेड, लातूर, उमरगा तसेच कर्नाटकामधील कलबुर्गी, बिदर आणि आळंद भाग यांना विजयपूरला जाण्यासाठी सर्वात सोयीचा आणि कमी अंतराचा आणि आर्थिक बचतीचा महामार्ग म्हणून या रस्त्याचे काम मार्गी लागणे अतिशय महत्त्वाचे होते.याचा विचार करून आमदार कल्याणशेट्टी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आग्रही मागणी केली होती. देगावं एक्स्प्रेस कॅनॉलच्या ४०० कोटींच्या कामानंतर आता पुन्हा तब्बल २७० कोटी रुपयांचे हे काम मार्गी लावले आहे.जानेवारी महिन्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अक्कलकोटला आले असता सदर रस्त्याचे काम त्वरित मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. त्याची पूर्तता लगेच होताना दिसत आहे. या रस्त्याचे काम पूर्णत्वास



गेल्यास गेल्या ३० वर्षांपासूनची अक्कलकोट ते तडवळ भागातली जनतेची मागणी पूर्णत्वास जाऊन दळणवळणाची सुविधा प्रचंड प्रमाणात वाढण्यास मदत होणार आहे.सदर रस्ता शेतकरी बांधवांना दुध व शेती उत्पादने तसेच कृषिपूरक उत्पादने बाजारपेठेत पाठविण्यासाठी मदतीचा ठरणार आहे. मराठवाड्यातील नांदेड, लातूर तसेच तेलंगणाच्या हैदराबाद तसेच बिदर, कलबुर्गी या कर्नाटकाच्या भागाला जवळच्या अंतराने जोडणारा अक्कलकोट व दक्षिण सोलापूर या दोन तालुक्यांच्या माध्यमातून जोडणारा महत्त्वाचा रस्ता आहे.पुढील ३० वर्षात वाढणारी वाहतूक विचारात घेऊन रस्ता बनविण्यात येणार आहे. सध्याची वाहतूक वर्दळ ७ हजार आहे, तर ३० वर्षानंतर ती ७० हजार होईल, अशी कल्पना करून रस्ता करण्यात येणार आहे. तडवळ साखर कारखान्याजवळ ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वाहतुकीचे अडथळा होऊ नये म्हणून तिथे रस्ता १० मीटरचा करण्यात येणार आहे. या कामाची निविदा प्रसिद्ध झाली असून लोकसभेच्या आचारसंहितेनंतर प्रत्यक्ष कामास सुरवात होणार आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .